गोपनीय

**क्रमांक : का.स./बैठक/२५२**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २८ एप्रिल, २०१७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या २५२व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

२४/४/१७

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. एन्. व्ही. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| अपर मुख्य सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५२वी बैठक

**दिनांक :** **०३ एप्रिल, २०१७ (सोमवार)**

**वेळ :** **सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ :** **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**सहावा मजला, मंत्रालय,**
**मुंबई – ४०० ०३२**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. सुमित मल्लिक<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. संजयकुमार<br>अपर मुख्य सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्रीमती वंदना कृष्णा
प्रधान सचिव,
(अपर मुख्य सचिव यांचे प्रतिनिधी),
वित्त विभाग

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
सह-महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा

श्रीमती विजयालक्ष्मी
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री. संजयकुमार, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे कार्यकारी समितीचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्री. स्वाधीन क्षत्रिय, माजी मुख्य सचिव यांनी 'पदसिध्द अध्यक्ष' म्हणून व श्री.श्रीकांत सिंह, माजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५१व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५१व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : सर्वंकष परिवहन अभ्यासाचे अद्यावतीकरण करण्यासाठी मे.LEA Associates South Asia Pvt.Ltd. (LASA) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणे.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबईतील वाहतूक व परिवहन व्यवस्थेचे सामर्थ्य, कार्यक्षमता आणि गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA), यांनी मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) अंतर्गत आणि जागतिक बँकेच्या तांत्रिक सहाय्याने २००५- २००८ मध्ये M/s. LEA International Ltd., Canada यांच्या मार्फत एक बहुउद्देशीय व्यापक सर्वंकष परिवहन अभ्यास (Comprehensive Transportation Study)आणि व्यवसाय आराखडा(Business Plan) तयार केला. सल्लागार M/s. LEA International Ltd, Canada यांनी सदर सर्वंकष परिवहन अभ्यास

जुलै, २००८ मध्ये पूर्ण केला असून, सदर अभ्यासात ४५० कि. मी. चे मेट्रो मार्गाचे जाळे १७४० कि. मी. चे रस्त्यांचे जाळे आणि २४८ कि. मी. उपनगरीय रेल्वेचे जाळे मुंबई महानगर प्रदेशाच्या गरजेनुसार क्षितीज कालावधी २०२१,२०३१ पर्यंत प्रस्तावित/शिफारस केले आहे. तसेच निधी शिफारस पर्याय, प्रस्तावित पायाभूत वाहतूक प्रकल्पांसाठी लागणारी संस्थात्मक व्यवस्था इत्यांदीचा या अभ्यासात समावेश होता. प्राधिकरणाने सर्वंकष परिवहन अभ्यासात केलेल्या विविध विकास योजना व प्रकल्पांच्या शिफारशींचा प्रामुख्याने विचार करुन त्यांचे नियोजनबद्ध व निधी उपलब्धतेनुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, २०१४ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये मा.मुख्यमंत्री, यांनी महानगर प्रदेशासाठी सर्वंकष परिवहन अभ्यासाचे अद्यावतीकरण करण्यात यावे अशी सूचना केली होती. तसेच प्राधिकरणाच्या १३४व्या बैठकीत प्राधिकरणाने असे निर्देश दिले की, महानगर प्रदेशामध्ये मागील दहा वर्षात झालेल्या मोठया सुधारणा/बदल इत्यादीचा विचार करुन सर्वंकष परिवहन अभ्यास अद्यावत करण्यात यावे.

३.३ महानगर आयुक्त यांनी सल्लागार नियुक्तीबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाने दिनांक ३० मे , २०१६ रोजी देशातील अग्रगण्य वृत्तपत्रात ई-निविदा प्रक्रियेची सूचना प्रसिध्द केली, ज्यामध्ये जागतिक प्रसिध्दी असलेल्या सल्लागारांकडून ई-निविदा मागविण्यात आल्या. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख ५ ऑगस्ट, २०१६ होती. दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी लिफाफा ‘अ’ (निविदा व इसारा किंमत) व ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले. एकूण पाच निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले.

३.४ प्राप्त झालेल्या ई-निविदांची पात्रता व तांत्रिक आणि वित्तीय निकष छाननीसाठी प्रस्तावाच्या विनंती अर्जाच्या कागदपत्रांत नेमून दिलेल्या पध्दतीनुसार तांत्रिक व वित्तीय प्रस्तावांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि सल्लागाराची निवडीची शिफारस करण्याकरीता सहा (६)

..५/-

सदस्यीय मुल्यमापन समिती स्थापन केली. ज्यामध्ये प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग व प्रमुख, नियोजन विभाग तसेच मुख्य लेखा अधिकारी आणि बाह्य सदस्य म्हणून संचालक, मुंबई ट्रान्सफॉर्मेशन सपोर्ट युनिट (MTSU) व मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ), शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ यांचा समावेश होता.

३.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मूल्यमापन समितीच्या सदस्यांनी केलेल्या मूल्यमापनाच्या निकालाचा सारांश आणि प्रत्येक सल्लागाराचे सरासरी तांत्रिक गुण रकान्यात दर्शविले आहेत :-

| अ.क्र | सल्लागार | तांत्रिक गुणसंख्या (१०० पैकी) |
|---|---|---|
| १ | M/s. AECOM Asia Company Ltd, Hongkong | ८१.३०८ |
| २ | M/s. DIMITS Limited, New Delhi, India | ८९.६९५ |
| ३ | M/s. Lea Associates South Asia Pvt. Ltd, New Delhi, India | ८९.७४१ |

विनंती प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे, ज्या निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावाला ८०% वा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. तांत्रिक निकषांनुसार पाच पैकी तीन निविदाकारांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असुन तिन्ही निविदाकार तांत्रिकदृष्टया निविदेतील अटींप्रमाणे पात्र झाले व त्यांचे वित्तीय प्रस्ताव मूल्यमापन समितीच्या मान्यतेनुसार उघडण्यात आले. प्राप्त वित्तीय प्रस्ताव (सेवा कर वगळता) खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | सल्लागार | वित्तीय प्रस्ताव (रु.) |
|---|---|---|
| १ | M/s. AECOM Asia Company Ltd, Hongkong | ५,९८,७१,३३६+ S.T. |
| २ | M/s. DIMITS Limited, New Delhi, India | ६,४८,८९,०५१+ S.T. |
| ३ | M/s. Lea Associates South Asia Pvt. Ltd, New Delhi, India | ४,८०,३४,५५० + S.T. |

३.६ निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या सल्लागारांचा प्रस्ताव ग्राह्य धरण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन प्राप्त संयुक्त गुण खालील तक्त्यात नमुद करण्यात आले आहेत :-

| अ. क्र. | सल्लागार | तांत्रिक गुणसंख्या (१०० पैकी) (Tm) | वित्तीय गुणसंख्या (१०० पैकी) (fm) | एकत्रित गुणसंख्या (तांत्रिकी व वित्तीय) (०.८*Tm+०.२*fm) | क्रमवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | M/s. AECOM Asia Company Ltd, Hongkong | ८१.३०८ | ८०.२३० | ८१.०९२ | ३ |
| २ | M/s. DIMITS Limited, New Delhi, India | ८९.६९५ | ७४.०२६ | ८६.५६१ | २ |
| ३ | M/s. Lea Associates South Asia Pvt. Ltd, New Delhi, India | ८९.७४१ | १००.००० | ९१.७९३ | १ |

३.७ वरील क्रमवारीस अनुसरुन "M/s. Lea Associates South Asia Pvt. Limited" आणि M/s. Lea International Ltd., Canada ह्यांच्या संयुक्त उपक्रमास कमाल संयुक्त गुण मिळाले असून यांचा रु. ४,८०,३४,५५० (चार कोटी ऐंशी लाख चौतीस हजार पाचशे पन्नास रुपये मात्र) एवढया किंमतीचा देकार आहे. निविदाकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा सुसंवादी व वाजवी असून मूल्यमापन समितीने संयुक्त तांत्रिक व वित्तीय मूल्यमापन अहवाल दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ रोजी सादर केला, त्याअनुषंगाने निविदा स्विकारण्यास शिफारस केली .

३.८ विनंती प्रस्तावातील खंड २६ च्या अटीनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या निविदाकाराला वित्तिय वाटाघाटी करण्यास बोलावण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन मूल्यमापन समितीने M/s. LEA Associate South Asia Pvt. Ltd., New

Delhi, India या प्रथम स्थान मिळविणाऱ्या संस्थेला चर्चेसाठी बोलविण्याची शिफारस केली. त्यानुसार M/s. LEA Associate South Asia Pvt. Ltd संस्थेबरोबर दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वाटाघाटीची बैठक घेण्यात आली. त्यास अनुसरुन सर्वंकष परिवहन अभ्यास अद्यावतीकरण करण्यासाठी M/s. LEA Associate South Asia Pvt. Ltd., New Delhi, India व LEA International Ltd. Canada यांना सल्लागार म्हणून मुल्यमापन समितीने नियुक्त करण्याची शिफारस केली.

३.९ प्रस्तावावर सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे:

३.१०.१ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, यांनी असे नमूद केले की, M/s. Lea Associates South Asia Pvt. Ltd. (LASA) ह्यांना याअगोदर महानगरपालिकेकरीता मुंबई शहरासाठी Comprehensive Mobility Plan तयार केला असून, अभ्यासाकरीता सर्वंकष परिवहन अभ्यासाचे अद्यावतीकरण करणे ह्या पेक्षा जास्त किंमत आकारली होती. त्यावर महानगर आयुक्तांनी सांगितले की, सदर अभ्यास हा संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशासाठी (MMR) असून, सर्वंकष परिवहन अभ्यासाचे अद्यावतीकरण करण्यात येत आहे. ज्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या Comprehensive Mobility Plan मध्ये एकत्रित केलेल्या माहितीचा उपयोग होऊ शकेल आणि अशी शक्यता नाकारता येऊ शकत नाही की उपलब्ध माहिती M/s. LASA कडे असल्यामुळे सदर अभ्यासासाठी कमी किंमतीचा देकार दिलेला आहे.

३.१०.२ श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी तांत्रिक व वित्तीय निकषांवरील ८०/२० किंवा ७०/३० भार याबाबत मुद्दा उपस्थित केला त्यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, सदर निकष हे जागतिक बँकेने ठरविलेल्या मार्गदर्शक तत्वांवर आधारित असून सदर निकषांद्वारे प्रस्तावांचे तांत्रिक व

वित्तीय मुल्यमापन करण्यात येते. त्यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी असे सुचविले की, प्रस्तावाचे मुल्यमापन करण्यासाठीचे ८०-२० आणि ७०-३० % भार हया निकषांचे धोरण ठरविणे महत्वाचे आहे. या मुद्यावर महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी एकदा प्रस्ताव तांत्रिकदृष्टया पात्र झाल्यानंतर निविदाकाराची निवड केवळ वित्तीय देकारावर करण्यात यावी असे मत व्यक्त केले. यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी वित्त विभागास याबाबतच्या धोरणांची पुनः तपासणी व सुधारणा करण्याचे निर्देश दिले.

३.१०.३ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, सदर अभ्यासाचे अद्यावतीकरण दरम्यान मुंबई महानगर प्रदेशाकरीता सक्षम परिवहन प्रकल्पांचे नियोजन करण्याची काळजी घेण्यात यावी, तसेच Mumbai Port Trust (MbPT) चे विकास योजनांचा अभ्यासात विचार करण्यात यावा, त्यावर महानगर आयुक्तांनी अंतर्भूत करण्यात येईल असे सांगितले.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३१६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मुंबईतील वाहतूक व परिवहन व्यवस्था अधिक सक्षम, कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने सर्वंकष परिवहन अभ्यासाचे अद्ययावतीकरण करण्यासाठी **M/s. LEA Associate South Asia Pvt. Ltd., New Delhi, India व LEA International**

**Ltd. Canada यांना सल्लागार म्हणून नियुक्त करण्याच्या प्रस्तावाला मान्यता देत आहे. तसेच M/s. LEA Associate South Asia Pvt. Ltd., New Delhi, India व LEA International Ltd. Canada यांना सर्व करांसह रु. ४,८०,३४,५५० (रुपये चार कोटी ऐंशी लाख चौतीस हजार पाचशे पन्नास) + सेवा कर** इतक्या रक्कमेवर नेमणूक करण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र.४ (जुना मुंबई – पुणे महामार्ग) वरील मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपुलाचे बांधकाम व रस्त्याचे रुंदीकरण करणे या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूलांच्या बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या १२९व्या बैठकीत ठराव क्र. १२६४ अन्वये रु. १११३.३५ कोटींच्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामामध्ये मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपूलाचे बांधकाम व रस्त्याचे रुंदीकरण करणे या कामाचा समावेश आहे. या कामासाठी मे. स्टूप कन्संल्टंट प्रा. लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २४४व्या बैठकीमध्ये ठराव क्र. १२७० अन्वये आणि तद्नंतर प्राधिकरणाच्या दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी झालेल्या १३७व्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक १३३६ अन्वये मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपूलाचे बांधकाम व रस्त्याच्या रुंदीकरणासहित उड्डाणपूल (३+३ मार्गिका) व त्या अनुषंगाने करावयाच्या इतर बाबीच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रु.१०७ कोटीस सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगीतले की, प्राधिकरणाने निविदेतील अटी व शर्ती, तांत्रिक बाबी, प्रस्तावित 'S' Curve नुसार Milestone ठरविणे, उड्डाणपूलाच्या कामातील Sepcifications मध्ये भारतीय मानकातील नवीन कोड मधील झालेले बदल लक्षात घेऊन ते तयार करणे इ. बाबींकरीता श्री. एस.आर. तांबे, तत्कालीन सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. जे.टी. नाशिककर, तत्कालीन सह-व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, श्री. रवि सिन्हा, प्राध्यापक, आयआयटी, मुंबई व श्री. डॉ. डी.टी. ठुबे, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण या चार सदस्यांची तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने प्रस्तावित केलेल्या निविदा अटी व शर्ती आणि अर्हता निकष तपासून तसेच सर्व तांत्रिक मुद्यांचे अवलोकन करुन निविदा संचामध्ये सुयोग्य बदल सुचविले.

४.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपूलाचे बांधकाम व अस्तित्वातील असलेल्या ३० मीटर रस्त्याचे रुंदीकरण ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयात दर्शविल्याप्रमाणे ६० मीटर इतके करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या प्रस्तावित ६० मीटरच्या ROW मध्ये मोठया प्रमाणात निवासी व अनिवासी अतिक्रमणे होती. ठाणे महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये प्रकल्पबाधित सर्व कच्ची निवासी व अनिवासी अतिक्रमणे काढून टाकली आहेत. प्रस्तावित कामामध्ये ९.९ मीटर रुंदीचे उड्डाणपूलाखालील रस्ते (C.C., Slip Road), अधिक दोन्ही बाजूस ७.५ मीटर रुंदीचे सेवा रस्ते, फुटपाथ, गटारे (Strom Water Drain), नाल्यांचे (Culverts) विस्तारीकरण इ. कामाचा अंतर्भाव आहे. रस्त्याची एकूण लांबी १३०० मीटर आहे. मे. स्टूप कन्संल्टंट प्रा. लि., या सल्लागाराने रु. ८९.५६ कोटी इतक्या अंदाजित किंमतीचे अंदाजपत्रक तयार करुन प्राधिकरणास सादर केलेले आहे. मुंब्रा येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाकरीता निविदा कत्रांटदाराच्या संकल्पनेवर व रस्त्याच्या कामाकरीता टक्केवारी दरावर निविदा मागविण्यात आली. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ३० महिने (पावसाळयासहीत) इतका प्रस्तावित आहे.

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर कामाच्या निविदा टक्केवारी दराने (On Percentage Basis) माहे जुलै, २०१६ मध्ये मागविण्यात आल्या. या देकारात मे.एन.सी.सी. लि. व मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. या दोनच निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. नियमाप्रमाणे पहिल्या देकारात तीन पूर्व अर्हता व निकष पूर्ण करणा-या निविदा प्राप्त झाल्यास

त्यांचे देकार उघडता येतात. सबब पहिल्या देकारातील दोनही निविदा रद्द करण्यात आल्या. दुस-या देकारासाठी निविदा दिनांक ३०/०९/२०१६ रोजी मागविण्यात आल्या. निविदेतील अटींप्रमाणे सर्व सोपस्कार पूर्ण केल्यानंतर दुस-या देकारात मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. व मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांच्या निविदा प्राप्त झाल्या. मुल्यांकनात मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी मूळ निविदेच्या अटी व शर्तींमध्ये ११ ठिकाणी फेरफार करुन बदल केलेली निविदा सादर केली. सबब त्यांची निविदा उघडण्यात आली नाही. मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रु.९९,९२,२६,८८७/- किंमतीचा आर्थिक देकार निविदेमध्ये नमूद अंदाजित किंमतीच्या ११.५६९% अधिक दराचा आहे. याबाबत मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेकडून अधिकतम दराचे स्पष्टीकरण मागविण्यात आले असता त्यांनी अधिकतम दराबाबत पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे :-

अ. गर्डरच्या कास्टिंग यार्ड करीता लागणा-या दोन एकर जागेसाठी प्रती एकर रु. ४ लाख दराने वाढीव खर्च होणार आहे. या खर्चाशिवाय गर्डरच्या वाहतूकीसाठी तसेच ऑब्लिगेटरी स्पॅनमधील स्लॅबच्या ओत कामाकरीता जमिनीवरुन आधाराशिवाय करावयासाठी येणारा जास्तीचा खर्च.

ब. उड्डाणपूलाचे बांधकाम करतेवेळेस सेवा रस्ते ३० महिन्यांच्या कालावधीकरीता सुस्थितीत ठेवण्याकरीता लागणारा जास्तीचा खर्च.

क. ३६ महिन्यांच्या दोष दायित्व कालावधीत रस्ते सुस्थितीत ठेवण्याकरीता लागणारा जास्तीचा खर्च.

ड. जिल्हा दर सूचीमध्ये अंतर्भूत नसलेल्या परंतु कामाच्या विम्यापोटी भरावा लागणारा खर्च.

इ. उड्डाणपूलाच्या संकल्पना व स्ट्रक्चरल डिझाईन करीता सल्लागाराच्या शुल्काकरीता लागणारा खर्च.

ई. सदर काम धार्मिकदृष्टया संवेदनशील क्षेत्रात असल्याकारणामुळे प्रत्यक्ष कामाच्या वेळेत होणारी घट व करावी लागणारी उपाययोजना याकरीता होणारा खर्च.

फ. सदर काम राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या अतिशय रहदारीच्या महामार्गावर करावयाचे असल्याने सुरक्षा कठडे व वाहतूक रक्षक या पोटी होणारा खर्च.

४.५ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. हे अशा प्रकारच्या कामामध्ये अनुभवी असून कामासाठी आवश्यक असणारे अद्ययावत तंत्रज्ञान, आवश्यक असणारे अनुभवी मुनष्यबळ, उपकरणे, व्यवसायातील आर्थिक उलाढाल, प्रकल्प पूर्ण करण्याची क्षमता व प्राधिकरणाकडील पूर्वी यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या कामांचा अनुभव व सर्वात महत्त्वाचे म्हणजे निविदेतील सूत्राप्रमाणे त्यांच्याकडे शिल्लक असलेली निविदा क्षमता (Balance Bid Capacity) रु. १९३७ कोटी आहे. मे.एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी स्वत:हून कामाची टक्केवारी दर ११.५६९% ऐवजी ९.३९% इतक्या दराने काम करण्याचे मान्य केले आहे.

४.६ चर्चेदरम्यान, कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितिन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी अशी विचारणा केली की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियम पुस्तिकेत दिल्याप्रमाणे पहिल्या निविदा सूचनेत कमी प्रतिसाद म्हणजे तीन पेक्षा कमी निविदाकार मिळाले तर निविदा उघडण्याच्या कालावधीस प्रथम किमान एक आठवडयाची मुदत दयावी अशी तरतूद आहे व अशी मुदत वाढ दिल्यानंतर देखील तीन पेक्षा कमी निविदाकार मिळाले तर दुस-यांदा एक आठवडयाची मुदत वाढ देण्यात यावी अशीही त्यात तरतूद असल्याचे नमूद केले. याबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, सदर नियम हा कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीबाबत असून तो स्थापत्य कामांसाठी नाही. स्थापत्य कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निविदा कार्यवाही बाबत वेळोवेळी प्रसिध्द होणारे नियम वापरण्यात येतात.

**निर्णय:** **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३१७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन

कार्यकारी समिती याव्दारे राष्ट्रीय महामार्ग क्र.४ (जूना मुंबई –पुणे महामार्ग) वरील मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपूलाचे बांधकाम व रस्त्याचे रुंदीकरण या प्रस्तावित कामासाठी मे. एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची लघुत्तम निविदा रक्कम रु. ९७,९७,११,४७२/- ही अंदाजित रक्कम रु. ८९,५६,१३,३७६/- पेक्षा ९.३९ टक्के अधिक दराने स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणारा अधिक निविदेनुसार देय भाववाढ संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ :** **विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्र.४ (जुना मुंबई – पुणे महामार्ग) वरील शिळ जंक्शन ते कल्याण जंक्शन येथे रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाच्या सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या सुमारे रु. १११३.३५ कोटी अंदाजित खर्चाच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल बांधकामांच्या कामांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या १२९व्या बैठकीत ठराव क्र. १२६४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामामध्ये शिळफाटा - कल्याणफाटा जंक्शन येथे रस्त्याच्या रुंदीकरणासहीत उड्डाणपूलाच्या बांधकामाचा समावेश आहे. या कामासाठी मे. स्टूप कन्संल्टंट प्रा. लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. दिनांक १२ जानेवारी, २०१५ झालेल्या कार्यकारी समितीच्या २४४व्या बैठकीमध्ये ठराव क्रमांक १२७० अन्वये आणि तद्नंतर प्राधिकरणाच्या दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी झालेल्या १३७व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१३३६ अन्वये शिळफाटा - कल्याणफाटा जंक्शन दरम्यान रस्त्याच्या रुंदीकरणासहीत उड्डाणपूल (३+३ मार्गिका) व त्या अनुषंगाने करावयाच्या इतर बाबीच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रु. २८३ कोटीस सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाने निविदेतील अटी व शर्ती, तांत्रिक बाबी, काम पूर्ण करतांना प्रस्तावित 'S' Curve नुसार Milestone ठरविणे, उड्डाणपूलाच्या कामातील Sepcifications मध्ये भारतीय मानकातील नवीन कोड मधील झालेले बदल लक्षात घेऊन ते तयार करणे इ. बाबींकरीता श्री. एस.आर. तांबे, तत्कालीन सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. जे.टी. नाशिककर, तत्कालीन सह-व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, श्री. रवि सिन्हा, प्राध्यापक, आयआयटी, मुंबई व श्री. डॉ. डी.टी. ठुबे, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण या चार सदस्यांची तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने प्रस्तावित केलेल्या निविदा अटी व शर्ती आणि अर्हता निकष तपासून तसेच सर्व तांत्रिक मुद्यांचे अवलोकन करुन निविदा संचामध्ये सुयोग्य बदल सुचविले.

५.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत पहिल्या टप्प्यात शिळ जंक्शन ते कल्याण जंक्शन दरम्यान अस्तित्वातील असलेल्या ३० मीटर रस्त्याचे रुंदीकरण ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखडयात दर्शविल्याप्रमाणे ६० मीटर इतके करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच दुस-या टप्प्यात शिळफाटा - कल्याणफाटा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलाचे काम महाराष्ट्र विद्युत पारेषण महामंडळाच्या तीन ४०० KV व एक २०० KV अतिउच्च दाबाचे विजवाहक मनोरे स्थंलातरीत केल्यानंतर हाती घेण्यात येईल. नविन उच्च दाबाचे विजवाहक मनोरे उभारण्याच्या कामी जमिन संपादनाचे काम ठाणे महानगरपालिकेतर्फे सुरु आहे. सदर प्रकल्पाच्या प्रस्तावित ६० मीटरच्या ROW मध्ये अनेक निवासी व अनिवासी अतिक्रमणे होती. ठाणे महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये प्रकल्पबाधित दोन पक्क्या निवासी इमारतीं शिवाय इतर सर्व कच्ची निवासी व अनिवासी अतिक्रमणे काढून टाकली आहेत. प्रस्तावित कामामध्ये ९.९ मीटर रुंदीचे उड्डाणपूलाखालील रस्ते (C.C., Slip Road), अधिक दोन्ही बाजूस ७.५ मीटर रुंदीचे सेवा रस्ते, फुटपाथ, गटारे (Strom Water Drain), नाल्यांचे (Culverts) विस्तारीकरण इ. कामाचा अंतर्भाव आहे. रस्त्याची एकूण लांबी २३८० मीटर आहे. मे. स्टूप कन्संल्टंट प्रा. लि., सल्लागाराने रु. ७७.९४ कोटी इतक्या अंदाजित किंमतीचे अंदाजपत्रक तयार करुन सादर केलेले आहे. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ३० महिने (पावसाळयासहीत) इतका प्रस्तावित आहे.

..१५/-

५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर कामासाठी टक्केवारी दराने (On Percentage basis) ऑनलाईन ई-निविदा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये मागविण्यात आल्या. खालील ६ निविदाकारांच्या निविदा ई-निविदेच्या नियमावलीप्रमाणे प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्राप्त झाल्या :-

अ) मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
ब) मे. ईगल इन्फ्रा इंडिया लि.
क) मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि.
ड) मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि.
इ) मे. आर पी एस इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि.
ई) मे. वितराग इन्फ्राप्रोजेक्ट लि. एल एल पी

सविस्तर निविदा सूचनेमध्ये विहित केलेल्या पात्रता निकषास अनुसरुन ई-लिफाफा 'अ' व ई-लिफाफा 'ब' मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन निविदांचे मुल्यांकन केले. सर्व ६ निविदा सुसंवादी असल्याचे आढळून आले. मुख्य अभियंता यांच्या मान्यतेने पात्र ठरलेल्या ६ निविदाकारांचे ई-लिफाफा 'क' आर्थिक देकार असलेले दि.०८/१२/२०१६ रोजी उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| **क्र.** | **निविदाकाराचे नाव** | **आर्थिक देकार रक्कम (रु. कोटीत)** | **दराची टक्केवारी** | **शिल्लक असलेली बोली क्षमता (Bid capacity) (रु. कोटीत)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १) | मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ६६,६०,३६,४१७/- | (-) १४.५५% | १३३६.७५ | व्दितीय लघुत्तम |
| २) | मे. इगल इन्फ्रा इंडिया लि. | ७१,५६,०९,१६८/- | (-) ०८.१९% | १२१८.७० | |
| ३) | मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | ६६,५९,५८,४७२/- | (-) १४.५६ | ९३३.५३ | **प्रथम लघुत्तम** |
| ४) | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. | ७५,७६,९९,२४०/- | (-) २.७९% | ३६७४.१४ | |
| ५) | मे. आर पी एस इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि. | ६८,८९,५२,१२३/- | (-) ११.६१% | ८९२.७३ | तृतीय लघुत्तम |
| ६) | मे. वितराग इन्फ्राप्रोजेक्ट लि. एल एल पी | ६९,४३,३०,२९९/- | (-) १०.९२% | ४१२.४८ | |

५.५ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, प्राप्त देकारात मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचा रु. ६६,५९,५८,४७२/- किंमतीचा आर्थिक देकार निविदे मध्ये नमूद अंदाजित किंमतीच्या १४.५६% कमी दराने असलेला आहे. सदर आर्थिक देकार हा कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा कमी असल्याने मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्याकडून दराचे स्पष्टीकरण मागविण्यात आले. मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदरबाबत खालीलप्रमाणे खुलासा केला आहे :-

अ. निविदेतील मुख्य बाबींचे (ज्यांची अंदाजित कामाच्या किंमतीच्या एकूण टक्केवारी ही ९०% आहे) दर पृथ:क्करण हे १४.५६% मूळ अंदाजित किमतीच्या कमी दरात करणे त्यांना शक्य आहे.

ब. त्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची सदर कामासाठी लागणारी सर्व प्रकारची यांत्रिक उपकरणे तसेच कॉंक्रिट प्लान्ट, अस्फाल्ट प्लान्ट, GSB व WMM हे या सर्व कामाच्या जागेच्या अगदी जवळ असल्यामुळे सदर कामातील बाबींकरीता लागणारी सामुग्री बाजार भावापेक्षा कमी दरात पुरवठा करणे शक्य होणार आहे.

**निर्णय:** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३१८ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे राष्ट्रीय महामार्ग क्र.४ (जूना मुंबई - पुणे महामार्ग) वरील शिळ जंक्शन ते कल्याण जंक्शन येथे रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम करणे या प्रस्तावित कामासाठी मे. एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांची रु. ६६,५९,५८,४७३/- ची लघुत्तम निविदा अंदाजित पत्रकीय किंमतीपेक्षा १४.५६% कमी दराने स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणारा अधिक निविदेनुसार देय भाववाढ संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : कल्याण बाहय वळण रस्ता (भाग-४) - दुर्गाडी पूल ते गंधारे पूल (साखळी-१४/१०० कि. मी. ते १८/२०० कि. मी.) ई-निविदा क्र.०००६७९ या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणे.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रस्तावित कल्याण बाहय वळण रस्त्यास प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीमध्ये विस्तारीत मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांर्गत (Extended MUIP) रु.५७८ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांर्गत (Extended MUIP) चा भाग म्हणून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयानुसार साखळी क्र.०/००० कि.मी. ते १८/२०० कि.मी. लांबीमध्ये ४५ मी. रुंदी व साखळी क्र. १८/२०० ते ३०/३०० कि.मी. लांबीमध्ये ३० मी. रुंदी असलेल्या एकुण ३०.३० कि.मी. इतक्या लांबीचा कल्याण बाहयवळण रस्ता हा संपूर्ण नवीन रस्ता बांधण्याचे प्राधिकरणाने नियोजन केले आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर रस्त्यासाठी आवश्यक असणा-या जमीनीचे संपादन करण्याची जबाबदारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे असून सदर कामाची अंमलबजावणी जमिनीच्या उपलब्धतेनुसार ३ प्राथम्यामध्ये आणि ७ विभागामध्ये निविदा बोलावून पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रस्तावित ७ विभागापैकी "दुर्गाडी पुल ते गंधारे पुल" असा ४.१ कि.मी. लांबीचा डांबरी रस्ता हा कल्याण बाह्यवळण रस्त्याचा भाग-४ आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी निविदा प्रक्रियेची माहिती देताना असे सांगितले की,

६.३.१ कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-४ या कामासाठी कंत्राटदाराच्या नेमणुकीसाठी टक्केवारी दराच्या नमुन्यातील ई-निविदा सूचना दिनांक २२/११/२०१६ रोजीच्या

इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रामध्ये, प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व ई-निविदा पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली. त्यास निविदा प्रपत्र डाऊनलोड केलेल्या २५ निविदाकारांपैकी विहित निविदा शुल्क व इसारा रक्कम भरुन ५ निविदाकारांनी प्रतिसाद दिला.

६.३.२ अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या निविदा शिफारस समितीने तांत्रिक मुल्यमापन अहवालास मान्यता देण्यासाठी केलेल्या शिफारशीनुसार दिनांक १६/०३/२०१७ रोजी सर्व ५ पात्र निविदाकारांचे ई-आर्थिक देकार उघडण्यात आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | टक्केवारी दर (%) | निविदा रक्कम (रु.) | शेरा (न्युनतम) |
|---|---|---|---|---|
| १. | मे.सुप्रिम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लि. | (+) ६.४९ | ९६,५३,०१,१७७/- | ५ वा |
| २. | मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. | (-) १२.१२ | ७९,६६,०६,८८७/- | ४ था |
| ३. | मे.एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | (-) १२.९९ | ७८,८७,२०,५८८/- | ३ रा |
| ४. | मे.एम.बी पाटील कन्स्ट्रक्शन लि. | (-) १६.२७ | ७५,८९,८८,३३३/- | २ रा |
| ५. | मे रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. | (-) २०.७० | ७१,८८,३१,६५९/- | १ ला |

६.३.२.१ प्राप्त देकारात मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा रु.७१,८८,३१,६५९/- इतक्या किंमतीचा, नमूद केलेल्या रु.९०,६४,७१,१९७/- इतक्या अंदाजित किंमतीपेक्षा (-) २०.७०% कमी असलेला प्रथम लघुत्तम आर्थिक देकार होता. सदर आर्थिक देकार हा कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा कमी असल्याने मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. या लघुत्तम निविदाकाराकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. तांत्रिक सल्लागाराने मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचा विचार करुन व त्यांनी सादर केलेल्या दरांचे विश्लेषण करुन सदर प्रथम लघुत्तम देकार स्विकारण्यास योग्य असल्याची शिफारस केली आहे.

६.३.३ उपरोक्त ६.३.२ ते ६.३.३ बाबींचा विचार करुन निविदा समितीने दिनांक २७/०३/२०१७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची प्रथम लघुत्तम निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

६.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. या कंत्राटदारास मुंबई महानगरपालिकेतील नोंदणी रद्द करण्याची (de register) कार्यवाही चालू असल्याचे समजते. मात्र, मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी यापूर्वी प्राधिकरणामध्ये गेल्या ७ वर्षामध्ये सहा कामे यशस्वीरित्या पूर्ण केलेली असून त्यांची कामगिरी समाधानकारक आहे. या अनुषंगाने महाअधिवक्ता (AG) यांनी दिलेले कायदेशीर मत महानगर आयुक्त यांनी वाचून दाखविले.

**निर्णय:** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३१९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत प्रकल्पांतर्गत कल्याण बाहय वळण रस्ता भाग-४ दुर्गाडी पूल ते गंधारे पूल (साखळी-१४/१०० कि.मी. ते १८/२०० कि.मी.) ई-निविदा क्र. ०००६७९ या कामाची मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची रु.७१,८८,३१,६५९/-इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा म्हणजेच निविदेमध्ये नमूद केलेल्या रु.९०,६४,७१,१९७/- इतक्या अंदाजित किंमतींपेक्षा (-) २०.७०% कमी असलेला अंतिम आर्थिक देकारास मान्यता प्रदान करीत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **कल्याण बाहय वळण रस्ता (भाग-५)**
**- गंधारे पूल ते मांडा जंक्शन (साखळी-१८/२०० कि. मी. ते २६/६०५ कि. मी.) ई-निविदा क्र.०००७६४ या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणे.**

७.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रस्तावित कल्याण बाहय वळण रस्त्यास प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीमध्ये विस्तारीत मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांर्गत (Extended MUIP) रु.५७८ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) चा भाग म्हणून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयानुसार साखळी क्र.०/००० कि.मी. ते १८/२०० कि.मी. लांबीमध्ये ४५ मी. रुंदी व साखळी क्र. १८/२०० ते ३०/३०० कि.मी. लांबीमध्ये ३० मी. रुंदी असलेल्या एकुण ३०.३० कि.मी. इतक्या लांबीचा कल्याण बाहयवळण रस्ता हा संपूर्ण नवीन रस्ता बांधण्याचे प्राधिकरणाने नियोजन केले आहे.

७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर रस्त्यासाठी आवश्यक असणा-या जमीनीचे संपादन करण्याची जबाबदारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे असून सदर कामाची अंमलबजावणी जमिनीच्या उपलब्धतेनुसार ३ प्राथम्यामध्ये आणि ७ विभागामध्ये निविदा बोलावून पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रस्तावित ७ विभागापैकी "गंधारे पूल ते मांडा जंक्शन" असा ८.४ कि.मी. लांबीचा डांबरी रस्ता हा कल्याण बाह्यवळण रस्त्याचा भाग-५ आहे.

७.३ महानगर आयुक्त यांनी निविदा प्रक्रियेची माहिती देताना असे सांगितले की,

७.३.१ कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-५ या कामासाठी कंत्राटदाराच्या नेमणुकीसाठी टक्केवारी दराच्या नमुन्यातील ई-निविदा सूचना दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रामध्ये, प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व ई-निविदा पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली. त्यास निविदा प्रपत्र डाऊनलोड केलेल्या २१ निविदाकारांपैकी विहित निविदा शुल्क व इसारा रक्कम भरुन ३ निविदाकारांनी प्रतिसाद दिला.

७.३.२ अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या निविदा शिफारस समितीने तांत्रिक मुल्यमापन अहवालास मान्यता देण्यासाठी केलेल्या शिफारशीनुसार दि.१६/०३/२०१७ रोजी सर्व ३ पात्र निविदाकारांचे ई-आर्थिक देकार उघडण्यात आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | टक्केवारी दर (%) | निविदा रक्कम (रु.) | शेरा (न्युनतम) |
|---|---|---|---|---|
| १. | मे.विशाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. | (-) ३.७१ | १३९,२०,८५,०१०/- | ३ रा |
| २. | मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. | (-) १०.६० | १२९,२४,७४,८१५/- | १ ला |
| ३. | मे.एम.बी पाटील कन्स्ट्रक्शन लि. | (-) ६.७८ | १३४,७७,०१,३६७/- | २ रा |

७.३.३ प्राप्त देकारात मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचा रु.१२९,२४,७४,८१५/- इतक्या किंमतीचा, नमूद केलेल्या रु.१४४,५७,२१,२७०/- इतक्या अंदाजित किंमतीपेक्षा (-) १०.६० कमी असलेला प्रथम लघुत्तम आर्थिक देकार होता. सदर आर्थिक देकार हा कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा कमी असल्याने मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. या लघुत्तम निविदाकाराकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. तांत्रिक सल्लागाराने मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचा विचार करुन व त्यांनी सादर केलेल्या दरांचे विश्लेषण करुन सदर प्रथम लघुत्तम देकार स्विकारण्यास योग्य असल्याची शिफारस केली आहे.

७.३.४ उपरोक्त ६.३.२ ते ६.३.३ बाबींचा विचार करुन निविदा समितीने दिनांक २७/०३/२०१७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची प्रथम लघुत्तम निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

७.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी यापूर्वी गेल्या ७ वर्षामध्ये प्राधिकरणाची कामे यशस्वीरित्या पूर्ण केलेली असून त्यांची कामगिरी समाधानकारक आहे.

**निर्णय:** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत कल्याण बाहय वळण रस्ता (भाग- ५) गंधारे पूल ते मांडा जंक्शन (साखळी-१८/२०० कि.मी. ते २६/६०५ कि.मी.) ई-निविदा क्र.०००७६४ या मे.अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांची रु.१२९,२४,७४,८१५/- इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा म्हणजेच निविदेमध्ये नमूद केलेल्या रु.१४४,५७,२१,२७०/- इतक्या अंदाजित किंमतींपेक्षा (-) १०.६०% कमी असलेला अंतिम आर्थिक देकारास तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ :** **कल्याण बाहय वळण रस्ता (भाग-६) - मांडा जंक्शन ते टिटवाळा जंक्शन (साखळी-२६/६०५ कि. मी. ते २९/७०० कि. मी.) ई-निविदा क्र.०००७६५ या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणे.**

८.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रस्तावित कल्याण बाहय वळण रस्त्यास प्राधिकरणाच्या दिनांक २७/०६/२०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीमध्ये विस्तारीत मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) रु.५७८ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. मुंबई नागरी सुविधा प्रकल्पांतर्गत (Extended MUIP) चा भाग म्हणून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर

विकास आराखडयानुसार साखळी क्र.०/००० कि.मी. ते १८/२०० कि.मी. लांबीमध्ये ४५ मी. रुंदी व साखळी क्र. १८/२०० ते ३०/३०० कि.मी. लांबीमध्ये ३० मी. रुंदी असलेल्या एकुण ३०.३० कि.मी. इतक्या लांबीचा कल्याण बाहयवळण रस्ता हा संपूर्ण नवीन रस्ता बांधण्याचे प्राधिकरणाने नियोजन केले आहे.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर रस्त्यासाठी आवश्यक असणा-या जमीनीचे संपादन करण्याची जबाबदारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे असून सदर कामाची अंमलबजावणी जमिनीच्या उपलब्धतेनुसार ३ प्राथम्यामध्ये आणि ७ विभागामध्ये निविदा बोलावून पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रस्तावित ७ विभागापैकी "मांडा जंक्शन ते टिटवाळा जंक्शन" असा ३.०९ कि.मी. लांबीचा डांबरी रस्ता हा कल्याण बाह्यवळण रस्त्याचा भाग-६ आहे.

८.३ महानगर आयुक्त यांनी निविदा प्रक्रियेची माहिती देताना असे सांगितले की,

८.३.१ कल्याण बाह्यवळण रस्ता भाग-६ या कामासाठी कंत्राटदाराच्या नेमणुकीसाठी टक्केवारी दराच्या नमुन्यातील ई-निविदा सूचना दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रामध्ये, प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर व ई-निविदा पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली. त्यास निविदा प्रपत्र डाऊनलोड केलेल्या २२ निविदाकारांपैकी विहित निविदा शुल्क व इसारा रक्कम भरुन ३ निविदाकारांनी प्रतिसाद दिला.

८.३.२ अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या निविदा शिफारस समितीने तांत्रिक मुल्यमापन अहवालास मान्यता देण्यासाठी केलेल्या शिफारशीनुसार दिनांक १६/०३/२०१७ रोजी सर्व ३ पात्र निविदाकारांचे ई-आर्थिक देकार उघडण्यात आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | टक्केवारी दर (%) | निविदा रक्कम (रु.) | शेरा (न्युनतम) |
|---|---|---|---|---|
| १. | मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. | (-) १५.६६ | ६१,९५,५२,७१९/- | १ला |
| २. | मे.एम.बी पाटील कन्स्ट्रक्शन लि. | (-) ६.७८ | ६८,४७,८४,२६०/- | ३रा |
| ३. | मे.एन.ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | (-) १३.०४ | ६३,८७,९८,९६२/- | २रा |

८.३.३ प्राप्त देकारात मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांचा रु.६१,९५,५२,७१९/- इतक्या किंमतीचा, नमूद केलेल्या रु.७३,४५,८९,४२३/- इतक्या अंदाजित किंमतीपेक्षा (-)१५.६६% कमी असलेला प्रथम लघुत्तम आर्थिक देकार होता. सदर आर्थिक देकार हा कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा कमी असल्याने मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. या लघुत्तम निविदाकाराकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. तांत्रिक सल्लागाराने मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचा विचार करुन व त्यांनी सादर केलेल्या दरांचे विश्लेषण करुन सदर प्रथम लघुत्तम देकार स्विकारण्यास योग्य असल्याची शिफारस केली आहे.

८.३.४ उपरोक्त ६.३.२ ते ६.३.३ बाबींचा विचार करुन निविदा समितीने दिनांक २७/०३/२०१७ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची प्रथम लघुत्तम निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

८.४ महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. या कंत्राटदारास मुंबई महानगरपालिकेतील नोंदणी रद्द करण्याची (de register) कार्यवाही चालू असल्याचे समजते. मात्र, मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांनी यापूर्वी प्राधिकरणामध्ये गेल्या ७ वर्षामध्ये सहा कामे यशस्वीरित्या पूर्ण केलेली असून त्यांची कामगिरी समाधानकारक आहे. या अनुषंगाने महाअधिवक्ता (AG) यांनी दिलेले कायदेशीर मत महानगर आयुक्त यांनी वाचून दाखविले.

**निर्णय:** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत प्रकल्पांतर्गत कल्याण बाहय वळण रस्ता भाग-६ मांडा जंक्शन ते टिटवाळा जंक्शन (साखळी- २६/६०५ कि.मी. ते २९/७०० कि.मी.)

ई-निविदा क्र.०००७६५ या कामाची मे.रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. यांची रु.६१,९५,५२,७१९/- इतक्या किंमतीची लघुत्तम निविदा म्हणजेच निविदेमध्ये नमूद केलेल्या रु.७३,४५,८९,४२३/- इतक्या अंदाजित किंमतीपेक्षा (-)१५.६६% कमी असलेला अंतिम आर्थिक देकारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करणे असा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येतो की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मुंबई पारबंदर प्रकल्पाकरीता फ्लेमिंगो तथा अन्य स्थलांतरीत पक्षी संरक्षण व संवर्धन उपाययोजना अंमलबजावणीसाठी यंत्रणेची नियुक्ती करणेसाठी मान्यता देणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मुंबई पारबंदर प्रकल्पासाठी वन जमीन हस्तांतरण प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक २२ जून, २०१५ रोजी झालेल्या ९व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला. फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरीत पक्षी यांच्यावर प्रकल्पाचा होणारा परिणाम आणि त्यावरील उपशमन योजना (mitigation measures) बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बीएनएचएस) यांच्याकडून प्राधिकरणाने प्राप्त करून घ्याव्यात अशा सूचना सदर बैठकीत देण्यात आल्या. त्यास अनुसरून फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरीत पक्षी यांच्यावर प्रकल्पाचा होणारा परिणाम आणि त्यावरील उपशमन योजना यांचा प्राथमिक अभ्यास करण्याची विनंती प्राधिकरणाने बीएनएचएस या संस्थेस केली. बीएनएचएसने याबाबतचा त्यांचा अहवाल दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी प्राधिकरणाला सादर केला. सदर अहवालामध्ये अन्य उपशमन योजनांसोबत प्रकल्पाची शिवडी मडफ्लॅटमधील आखणी दक्षिण बाजूस सरकवावी अशीही सूचना करण्यात आली होती. सदर अहवालामध्ये शिफारस केलेल्या उपशमन उपाययोजनांचा समावेश वनजमीन हस्तांतर प्रस्तावात करून सदर प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाकडे सादर करण्यात आला.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाने बीएनएचएसने सुचविलेल्या उपशमन उपाययोजनांबाबत राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता घेण्यास आदेशित केले. त्यानुसार सदर उपशमन योजनांवर राज्य वन्यजीव मंडळाच्या दिनांक ०४ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या १०व्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली आणि प्रकल्पाची आखणी बदलण्याव्यतिरिक्त अन्य उपशमन उपाययोजना काही सुधारणांसह मंजूर करण्यात आल्या.

९.३ महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, केंद्रीय पर्यावरण व वने मंत्रालयाने दिलेल्या वनजमीन हस्तांतरण परवानगीमध्ये तसेच कोस्टल रेग्युलेशन झोन (CRZ) परवानगीमध्ये राज्य वन्यजीव मंडळाने मान्य केलेल्या उपशमन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची अट घालण्यात आली आहे. तसेच या सर्व परवानग्यांमध्ये स्पष्टपणे बीएनएचएस यांचेकडून प्राप्त झालेल्या उपशमन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्राधिकरणावर टाकण्यात आली आहे.

९.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही निदर्शनास आणले की, बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बीएनएचएस) ही आंतरराष्ट्रीय दर्जाची अशासकीय संस्था असून या संस्थेचे फ्लेमिंगो तथा अन्य स्थलांतरीत पक्षी यांच्या संरक्षण व संवर्धनाचे काम आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. त्यामुळे राज्य वन्यजीव मंडळाने मान्य केलेल्या उपशमन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी बीएनएचएसकडेच दिल्यास सदर काम योग्य पध्दतीने पूर्ण होऊ शकेल. राज्य वन्यजीव मंडळाने मान्यता दिलेल्या उपशमन उपाययोजनांपैकी मुंबई पारबंदर प्रकल्पाकरीता फ्लेमिंगो तथा अन्य स्थलांतरीत पक्षी संरक्षण व संवर्धन उपाययोजना अंमलबजावणीसाठी बीएनएचएसकडे विचारणा केली होती. यास अनुसरून बीएनएचएसने दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केला असून यामध्ये तांत्रिक प्रस्ताव व रु.३१,९२,७३,२४०/- किंमतीचा आर्थिक प्रस्ताव आहे.

९.५ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या कामाकरीता स्पर्धात्मक निविदा बोलाविण्यास कोणती अडचण आहे अशी विचारणा केली. याबाबत महानगर आयुक्त यांनी निदर्शनास आणले की,

अ) सल्लागाराची नेमणूक सर्वसाधारणपणे केंद्रीय दक्षता आयोगाच्या (Central..

२७/-

Vigilance Commission) मार्गदर्शक तत्त्वांनुसार निविदा बोलावून करण्यात येते. केंद्रीय दक्षता आयोगाच्या दिनांक २८ ऑक्टोबर, २०११ रोजीच्या इंग्रजी परिपत्रक क्र.१२/१०/११ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे :-

*"It has been decided after due consideration, that in so far as the World Bank Projects and other international funding agencies such as IMF, ADB etc. are concerned, the department / organisations have no other alternative but to go by the criteria prescribed by the World Bank / concerned agencies and the Commission's instructions would not be applicable specifically to those projects.....".*

*ब)* तसेच Guidelines for Procurement under Japanese ODA Loans (Handbook April, २०१२) मधील Guidelines for employment of Consultants under Japanese ODA loans (Part III Selection procedures Section ३.०१ (४) page २१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"(४) Single-source selection (SSS) shall be used only in exceptional cases. The justification for SSS shall be examined in the overall interest of the Borrower and the project, ....."

(a) **for tasks that represent a natural continuation of previous work carried out by the Consultant**

(b) .....

(c) ......

(d) when only one consultant is qualified **or has experience of exceptional worth for the assignment.**

सदर प्रस्ताव वरील मार्गदर्शक सुचना ४ (a) व ४ (d) शी सुसंगत आहे.

क) त्याचप्रमाणे केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या सर्वसाधारण वित्तीय नियम, २००५ मधील (General Financial Rules) नियम १७६ मध्ये Consultancy by nomination ची तरतूद आहे.

ड) फ्लेमिंगो आणि अन्य स्थलांतरीत पक्षी यांच्या संरक्षण व संवर्धनाचे काम बीएनएचएस गेली अनेक दशके करत आहे. बीएनएचएस ही संस्था मुंबई स्थित आहे आणि या संस्थेकडे मुंबईतील समुद्राशी संलग्न भागांतील पक्ष्यांबाबत काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता आणि बीएनएचएस या संस्थेचा संबंधीत क्षेत्रातील तज्ञ अनुभव पहाता सदर कामाकरीता बीएनएचएसची नेमणूक करणे योग्य राहील असे महानगर आयुक्त यांनी निदर्शनास आणले.

९.६ केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाकडे कोस्टल रेग्युलेशन झोन (CRZ) परवानगी मागताना बीएनएचएसने सुचविलेल्या उपशमन, उपाययोजना अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाने सुमारे रु.४९ कोटींची आर्थिक तरतूद प्रस्तावित केली आहे. बीएनएचएसने फ्लेमिंगो व स्थलांतरीत पक्षी यांच्या सरंक्षण व संवर्धन अंमलबजावणीकरीता दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेला आर्थिक प्रस्ताव रु.३५,६३,९८,९६०/- किंमतीचा होता. यावर प्राधिकरणाने बीएनएचएस यांना चर्चेसाठी दिनांक १३ मे, २०१६ रोजी आमंत्रित केले होते. सदर चर्चेतील वाटाघाटीनंतर बीएनएचएसने रु.३१,९२,७३,२४०/- किंमतीचा सुधारीत आर्थिक प्रस्ताव प्राधिकरणास दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्राद्वारे सादर केला. या बीएनएचएसने सादर केलेल्या आर्थिक प्रस्तावाची प्राधिकरणातील वन-अधिकारी व प्रकल्प सल्लागार यांचेमार्फत पडताळणी करण्यात आली असून सदर आर्थिक प्रस्ताव वाजवी असल्याची खातरजमा करण्यात आली आहे असे महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

९.७ वरील बाबी लक्षात घेता, महानगर आयुक्त यांनी, राज्य वन्यजीव मंडळाने मुंबई पारबंदर प्रकल्पासाठी नमूद केलेल्या उपशमन उपाययोजनांपैकी फ्लेमिंगो तथा अन्य स्थलांतरीत पक्षी संरक्षण व संवर्धन उपाययोजना अंमलबजावणी करुन मुंबई पारबंदर प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी बीएनएचएस या संस्थेची नियुक्ती करण्यास मंजूरी देण्याची कार्यकारी समितीस विनंती केली.

..२९/-

**निर्णय:** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समितीद्वारे मुंबई पारबंदर प्रकल्पामधील फ्लेमिंगो तथा अन्य स्थलांतरीत पक्षी संरक्षण व सवंर्धन उपयायोजना अंमलबजावणी हे विशेष शास्त्रीय पध्दतीचे काम असल्यामुळे या कामाकरीता बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बीएनएचएस) या संस्थेची नियुक्ती करण्यास व बीएनएचएस यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील कामाची व्याप्ती आणि रु.३१,९२,७३,२४०/- किंमतीच्या आर्थिक प्रस्तावास याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी (बीएनएचएस) यांची नियुक्ती करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० :** **संत गाडगे महाराज चौक – वडाळा – चेंबूर या मार्गावर सार्वजनिक वाहतूक यंत्रणेच्या अंमलबजावणीसाठी नियुक्ती करण्यात आलेला प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग मे. लुईस बर्जर ग्रुप यांना वाढीव मुदत आणि त्यासाठी सुधारीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

१०.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक २८ मे,२००९ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २२७ व्या बैठकीत ठराव क्र. ११३१ अन्वये ३० महिन्यासाठी रू.३५,११,५०,०००/- अधिक सेवा कर एवढया रक्कमेकरीता मे.लुईस बर्जर ग्रुप यांना प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रुफ चेकिंग सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली होती. करारानुसार प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांची नियुक्ती माहे जून, २००९ पासून ३०+३ = ३३ महिने (अतिरिक्त शुल्काशिवाय) गृहित धरता, प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा कार्यकाळ माहे फेब्रुवारी, २०१२ पर्यत पूर्ण झाला. परंतु काम पूर्ण करण्यात येणा-या अडचणी लक्षात घेता प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार यांचा

..३०/-

कार्यकाळ कार्यकारी समितीच्या २३६व्या बैठकीत ठराव क्र. १२१७ अन्वये माहे मार्च, २०१२ ते माहे फेब्रुवारी, २०१४ पर्यत (२४ महिने) रु. ३३,००,००,९०९/- अधिक सेवा कर व कार्यकारी समितीच्या २४२व्या बैठकीत ठराव क्र. १२५८ अन्वये माहे मार्च, २०१४ ते माहे डिसेंबर, २०१५ पर्यत (२२ महिने) रु. २०,९८,२२,५००/- अधिक सेवा कर अशा वाढीव मुदत खर्चास मान्यता देण्यात आली होती.

१०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मोनोरेल टप्पा - १ वडाळा ते चेंबूर या मार्गिकेचे काम पूर्ण झाले असून सदर मार्ग दिनांक २ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रवाशी वाहतूकीसाठी खुला करण्यात आलेला आहे. टप्पा - २ चे स्थापत्य काम अंदाजे ९८% पूर्ण झाले असून सिग्नलींग आणि टेलीकम्युनिकेशन, इलेक्ट्रीकल, रोलींग स्टॉक चे डब्बे, ऑटोफेअर कलेक्शन, स्टेशन कार्यप्रणाली चे काम प्रगतीपथावर आहे. तसेच टप्पा १ व टप्पा २ यासाठी कंत्राटदाराला ऑगस्ट, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पुढे त्यांनी असेही सांगितले की, मुंबई मोनोरेल प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्यापुर्वी अरूंद रस्त्यावरील वाहतूक वळविणे अथवा फेरबदल करणे गरजेचे असल्याने, वाहतूक पोलिसांची परवानगी मिळण्याच्या प्रक्रियेस बराच कालावधी लागला. मोनोरेल मार्गिकेमध्ये बाधित होण्या-या झोपडयांचे पुनर्वसन, झाडांचे पुन:रोपण/कापणे, भुमिगत जल वाहिन्या इ. स्थलांतरीत करणे यासाठी स्थानिक संस्थेकडून परवानगी मिळण्यास आणि सदर कार्यवाही करण्याच्या प्रक्रियेस बराच कालावधी लागला. याशिवाय टप्पा - २ मध्ये हार्बर रेल्वेवरील वडाळा रोड व मध्ये रेल्वे वरील करी रोड येथील रेल्वेचे रूळ ओलांडण्याकरीता परवानगी मिळण्यासाठी बराच कालावधी लागला.

१०.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे. लुईस बर्जर ग्रुप, आय. एन.सी. (USA) या कंपनीला वाढीव मुदतीसाठी माहे मार्च, २०१२ ते डिसेंबर,२०१५ पर्यंत रू.५३,९८,२३,४००/- रक्कम मंजूर केले होते, या कालावधीत सदर कंपनीस एकूण रक्कम रू.४७,२०,१९,५६०/- अदा करण्यात आले आहेत. सदर कालावधीत शिल्लक असलेल्या निधी रू.६,७८,०३,८४९/- च्या अधिन राहुन सदर सल्लागारास जानेवारी, २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ पर्यंत वाढीव मुदत देण्यात आली होती.

१०.४ तद्नंतर, मे. लुईस बर्जर ग्रुप यांनी, सदर कामावर देखरेख करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार त्याचबरोबर टप्पा -२ चे उर्वरित कार्यविनित (Commissioning of Phase-II), कार्य व देखभालसाठी ऑपरेटर नियुक्त करणे इत्यादी कामे करण्यासाठी (१४ महिनासाठी - नोव्हेंबर, २०१६ ते डिसेंबर, २०१७ पर्यंत) रू.१४,९८,५१,५००/- इतक्या रक्कमेचे प्रस्ताव दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्राधिकरणास सादर केला. सदर प्रस्तावाची छाननी करुन मे.लुईस बर्जर ग्रुप यांचा प्रस्ताव व त्यांनी प्रस्तावित केलेले मनुष्यबळ यावरती सखोल चर्चा करण्यात आली होती. वरील सर्व गोष्टींचा विचार करून सल्लागारास माहे डिसेंबर, २०१७ ऐवजी ऑक्टोबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याची शिफारस केली. शिवाय कमिटीने manmonth मध्ये कामाचे स्वरूप पाहुन आवश्यकतेनुसार फेरफार करून सल्लागारास नोव्हेंबर, २०१६ पासून ऑक्टोबर, २०१७ (१२ महिने) पर्यंत रू.१०,३६,६७,५००/- इतकी रक्कम देण्यासाठी शिफारस केली आहे. तसेच कार्यकारी समितीच्या २४२ व्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे, प्रकल्पाच्या वाढीव कालावधी करीता प्रकल्प सल्लागाराला ७०% फी प्रत्यक्ष मनुष्यबळानुसार (Actual Man Month Basis) आणि ३०% फी, ही प्रकल्पाच्या वित्तीय प्रगतीनुसार देण्यात यावी, त्यानुसार ही शिफारस केली.

**निर्णय :** **तद्नंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३२३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मोनोरेल प्रकल्प संत गाडगे महाराज चौक -वडाळा- चेंबूर या कामाकरिता नेमणूक केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन व प्रुफ चेकिंग सल्लागार, मे. लुईस बर्जर ग्रुप, आय. एन. सी. (USA) यांना माहे नोव्हेंबर, २०१६ पासून ऑक्टोबर, २०१७ (१२ महिने) पर्यंत वाढीव कालावधीकरीता रू. १०,३६,६७,५००/- अधिक सेवा कर या वाढीव खर्चास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.११ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.</u>**

११.१ सदर बाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.९ च्या पोट-नियम क्रमांक (अकरा), (बारा) आणि (तेरा) नुसार पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (लँड स्केपिंग) या विषयावरील ३ तज्ञ व्यक्तींची सभासद म्हणून प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने नेमणूक करावयाची असते. संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.१२ प्रमाणे नामनिर्देशित सदस्यांच्या सदस्यत्वाचा कालावधी ३ वर्षाचा आहे. यापूर्वी डॉ.श्रीमती नंदीनी देशमुख, डॉ.मार्सिलीन अल्मेडा व प्रो. नरेश चंद्र यांचे नामनिर्देशन ३ वर्षाकरीता केले होते व त्यांचा ३ वर्षाचा कालावधी दिनांक १० डिसेंबर, २०१६ रोजी संपलेला आहे.

११.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाकडे पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (लँड स्केपिंग) या विषयातील तज्ञ व्यक्तींपैकी श्रीमती डॉ. मनिषा कायंदे, डॉ. सी.एस. लट्टू व डॉ. अनिल पाटील या तज्ञ व्यक्तींची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती प्राप्त झाली असून ती बाब टिप्पणी सोबत जोडली आहे. तरी, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सदर संस्थेच्या नियमावलीच्या नियम क्र.९ च्या पोट-नियम क्रमांक (अकरा), (बारा) आणि (तेरा) नुसार पर्यावरण शिक्षण, वनस्पतीशास्त्र, सागरी जीवन आणि भूदृश्य (लँड स्केपिंग) या विषयातील तज्ञ असलेल्या श्रीमती डॉ. मनिषा कायंदे, डॉ.सी.एस. लट्टू व डॉ. अनिल पाटील या व्यक्तींची महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर रिक्त झालेल्या तीन सदस्यांचे जागी नामनिर्देशन करणेबाबत प्रस्ताव कार्यकारी समितीच्या विचारार्थ सादर केला आहे.

..३३/-

११.३ चर्चेच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, श्रीमती डॉ. मनिषा कायंदे, डॉ.सी.एस. लट्टू या दोन व्यक्तींचे नामनिर्देशन यावेळी करण्यात यावे व उर्वरित एका रिक्त जागी कार्यकारी समितीच्या सदस्यांनी/ निमंत्रितांनी एका तज्ञ व्यक्तीचे नाव सुचवावे व त्यानुसार पुढील बैठकीत त्यांचे नामनिर्देशन करण्यात येईल.

निर्णय: त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१३२४ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीतील नियम क्र.९ चे पोट नियम क्र. (अकरा), (बारा) व (तेरा) व नियम क्र.१२ आणि त्यास सहाय्यभूत होणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे श्रीमती डॉ. मनिषा कायंदे, डॉ.सी.एस. लट्टू यांची महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सदस्य म्हणून पुढील ३ वर्षाकरीता नामनिर्देशन करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१२: प्राधिकरणाचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**बाब क्र.१३ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१६**

दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०१६ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********